Procedure) विहीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन पुरकपत्र क्रमांक : संकीर्ण-२०१४/(१९७/१४)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०७ मे, २०१६.

पहा : १) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि ४, दि ३० १० २०१०
२) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०११/(२४०/११)/मशि ४, दि २५ १० २०११
३) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१२/(२४७/१२)/मशि ४, दि.०२.०९ २०१३

शासन पुरकपत्र :-

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील कलम ८२ व ८३ तर शासन निर्णय दि.३० १०.२०१० अन्वये अकृषि विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालये/ विद्याशाखा / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त तुकडया यांना मान्यता देण्याची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.३०.१०.२०१० अन्वये प्रथमच नविन महाविद्यालय व विस्तारीकरणासंदर्भात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाना मान्यता देण्यासाठी निकष विहित करण्यात आलेले आहेत. सदर निकषांमध्ये वेळो-वेळी सुधारणा करण्यात आलेली असून त्या दि.२५ १०.२०११ व दि.०२.०९.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहे. सध्या दि.०२ ०९.२०१३ च्या शासन निर्णयानुसार प्रस्तावांना मान्यता देण्याच्या प्रक्रिया अवलंबविण्यात येत आहे.

तथापि, विद्यापीठांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची शासन स्तरावर तपासणी / छाननी केली असता, बहुताश प्रस्ताव विहीत निकष पूर्ण करीत नसल्याने मान्यतेसाठी पात्र ठरत नाहीत. परिणामी अनेक संस्थाचालकांद्वारे न्यायालयीन प्रकरणे दाखल केली जातात. त्याचप्रमाणे काही न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रस्ताव त्रुटी पुर्तता करीत नसल्याने अपात्र ठरवला असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणल्यानंतरही, विद्यापीठे आम्ही शासनास प्रस्ताव शिफारशीत केला असल्याची भुमिका घेतात. त्यामुळे त्याबाबत थेट शासनास जबाबदार धरले जात आहे. या पार्श्वभुमीवर शासन निर्णय दि. ०२.०९.२०१३ मधील निकषाच्या अनुषंगाने मानक संचालन प्रक्रिया (Standard Operating Procedure) विहीत करणे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे मानक संचालन प्रक्रिया (Standard Operating Procedure) विहीत करीत आहे -

मानक संचालन प्रक्रिया (Standard Operating Procedure)

| अ. क्र. | तपशिल (शासन निर्णय दि. ०२.०९.२०१३ मधील निकष) | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय मजूरीसाठी विहीत केलेला अर्ज जोडावा व अर्जासोबत असलेल्या एकूण कागदपत्रांची पृष्ठसंख्या नमूद करावी. | विहीत नमुन्यातील अर्ज. |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत | संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत विहीत केलेले नोंदणी प्रमाणपत्र किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १९५० अंतर्गत विहीत केलेले नोंदणी प्रमाणपत्र. (F प्रमाणपत्र) |
| ३. | संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले असल्याची कागदपत्रे/दस्त ऐवज. | उपरोक्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र (नोंदणी दिनांकाच्या उल्लेखासह) |
| ४. | संस्थेच्या घटनेची साक्षांकीत प्रत व नियमावली. | संस्था ज्या अधिनियमांतर्गत सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत झाली आहे त्या प्राधिकरणाकडे सादर केलेले व त्यांनी स्वीकृत केलेली घटना व नियमावलीची साक्षांकीत प्रत. |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाची प्रत | प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेला लेखा परीक्षण अहवाल (मागील वर्षाचा) हा सनदी लेखापालाने प्रमाणित व साक्षांकीत केलेला असणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| ६. | किमान ५ लक्ष रुपयांची सुरक्षा ठेव प्रमाणपत्राची प्रत. | सुरक्षा ठेव प्रमाणपत्राची मुदत प्रस्ताव ज्या शैक्षणिक वर्षासाठी सादर केला आहे, त्यानंतरच्या किमान दोन वर्षापर्यंतची असावी. |
| ७. | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेले तपशिलवार अंदाजपत्रक हे संस्थेद्वारे प्रमाणित व साक्षांकीत केलेले असणे आवश्यक. |
| ८. | संस्थेचे व्यवहार राष्ट्रीयीकृत / शेड्युल्ड बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | संस्थेच्या नावाने राष्ट्रीयीकृत / शेड्युल्ड बँकेत असलेल्या बँक खाते पुस्तकाची साक्षांकीत प्रत |
| ९. | ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयीकृत / शेड्युल्ड बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | सदर संयुक्त आश्वासन पत्रावर बँकेचा शाखा प्रबंधक/प्रमुख यांचा सही व शिक्का तसेच संस्था चालकाचे नाव, पदनामासह सही व शिक्का असणे आवश्यक. |
| १०. | महाविद्यालय कायम विनाअनुदान तत्वाच्या नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे १०० रु.च्या स्टँम्प पेपरवरील नोंदणीकृत हमीपत्र. | संस्थेचे नोंदणीकृत व साक्षांकित हमीपत्र. |
| ११. | १) स्वत:ची जागा असल्यास- | अ) जागा संस्थेच्या नावे असल्याबाबतची अधिकृत कागदपत्रे. (७/१२उतारा /प्रॉपर्टी कार्ड / टॅक्स पावती इ.)<br>ब) सदर जागा अकृषक असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे साक्षांकित प्रमाणपत्र /कागदपत्र किंवा ना-हरकत प्रमाणपत्र. |
| | २) भाडयाची जागा असल्यास- | अ) भाडेकरारनामा हा दुय्यम निबधकाकडे नोंदणीकृत असावा<br>ब) सदर करारनामा किमान ५ वर्ष मुदतीचा असावा.<br>क) मुळ मालकाच्या नावावरील अधिकृत कागदपत्रे (७/१२ उतारा / प्रॉपर्टीकार्ड / टॅक्स पावती इ )<br>ड) सदर जागा अकृषक असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे साक्षांकित प्रमाणपत्र/कागदपत्र किंवा ना-हरकत प्रमाणपत्र. |
| १२. | अ) इमारत (स्वत:ची) - शैक्षणिक व प्रशासकीय इमारत- | १) शासन निर्णय दि. ०२.०९.२०१३ मधील प्रपत्र "अ" मध्ये विहीत केलेले कक्षनिहाय क्षेत्रफळ उपलब्ध असल्याचे संस्था चालकाचे शपथपत्र.<br>२) संबंधित इमारतीचे स्थानिक प्राधिकरण किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे (क्षेत्रफळासहीत) (गाव नमुना ८ / प्रॉपर्टी कार्ड / संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा इमारत बांधकाम परवाना / बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र / भोगवटा प्रमाणपत्र / स्थानिक प्राधिकरणाने मंजुरी दिलेला इमारत आराखडा) |
| | ब) इमारत (भाडयाने) - शैक्षणिक व प्रशासकीय इमारत - | अ) भाडेकरारनामा हा दुय्यम निबधकाकडे नोंदणीकृत असावा.<br>ब) सदर करारनामा किमान ५ वर्ष मुदतीचा असावा.<br>क) शासन निर्णय दि. ०२.०९.२०१३ मधील प्रपत्र "अ" मध्ये विहीत केलेले कक्षनिहाय क्षेत्रफळ उपलब्ध असल्याचे संस्था चालकाचे शपथपत्र .<br>ड) संबंधित इमारतीचे स्थानिक प्राधिकरण किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे (क्षेत्रफळासहीत) (गाव नमुना ८ / प्रॉपर्टी कार्ड / संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा इमारत बांधकाम परवाना / बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र / भोगवटा प्रमाणपत्र / स्थानिक प्राधिकरणाने मंजुरी दिलेला इमारत आराखडा) |
| | २१) पाणी सुविधा | स्वत:ची असल्यास- संबंधित संस्थाचालकाचे स्थानिक सक्षम प्राधिकाऱ्याने (ग्रामसेवक / मुख्याधिकारी / महानगरपालिकेतील संबंधित सक्षम प्राधिकारी) साक्षांकित केलेले शपथपत्र. |

| | | |
|---|---|---|
| | | स्थानिक प्राधिकरणाची असल्यास - स्थानिक प्राधिकरणाची पाणीपट्टी पावती. |
| | २.२) वीज सुविधा | अ) जागा स्वत:ची असल्यास संस्थेच्या नावे असलेले विद्युत वितरण महामंडळाचे वीज देयक.<br>ब) जागा भाड्याची असल्यास मूळ जागा मालकाच्या नावे असलेल्या विद्युत वितरण कंपनीचे वीज देयक. |
| | २.३) ड्रेनेज सुविधा | स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह साक्षांकीत प्रमाणपत्र. |
| | ३) वसतीगृह सुविधा | महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या किमान २० टक्के विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध असल्याबाबतचे संस्थेचे प्रमाणपत्र. |
| १३. | फर्निचर उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा त्यासाठी रु. ५.०० लक्ष शिल्लक ठेवल्याबाबतचे प्रमाणपत्र. | महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेले फर्निचर हे निकष क्र.१२ मध्ये नमूद केलेल्या कक्षांसाठी व सुविधांसाठी पुरेसे असल्याबाबतचे संस्थेचे शपथपत्र व ते खरेदी केल्याची पावती किंवा त्यासाठी आवश्यक असलेला निधी संस्थेच्या नावे उपलब्ध असल्याचे संस्थाचालकाचे शपथपत्र व त्याबाबतची आवश्यक ती समर्थनीय कागदपत्रे (बँक ठेव पुस्तक / लेखा परिक्षण अहवालाची साक्षांकित प्रत) |
| १४. | ग्रंथालय सुविधा. | महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अभ्यासक्रमाशी निगडीत किमान ५०० पुस्तके उपलब्ध असल्याचे संस्थेचे शपथपत्र व खरेदी पावती तसेच पुस्तकाची यादी |
| १५. | भाड्याची जागा असल्यास संलग्निकरणानंतर ५ वर्षात महाविद्यालय स्वत:च्या इमारतीत स्थलांतीरत करण्याबाबतचे हमीपत्र. | संस्थेचे रु.१०० च्या बॉंडपेपरवर हमीपत्र आवश्यक. |
| १६. | संस्थेचे प्रस्तावित महाविद्यालयाशिवाय इतर महाविद्यालय / महाविद्यालये असल्यास त्यांच्या नॅक मुल्यांकनाबाबतची स्थिती. | संस्थेची कार्यरत महाविद्यालये, महाविद्यालय निहाय मान्यता वर्ष, सदर महाविद्यालयांच्या नॅक मुल्याकन / पुनर्मुल्यांकनाबाबतची कागदपत्रे किंवा त्यासाठी आवश्यक तो अर्ज संबधित प्राधिकरणाकडे केला असल्याचे साक्षांकित समर्थनीय कागदपत्रे. |

२. नवीन महाविद्यालय / विस्तारीकरणाच्या प्रस्तावांसोबत वरील कागदपत्रे क्रमाने जोडणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे अर्जदार संस्थांनी प्रस्तावासोबत जोडलेल्या वरील कागदपत्रांची तपासणी व सत्यता पडताळण्याची तसेच या प्रस्तावांमध्ये प्रत्यक्ष सुविधांची तपासणी करण्याची जबाबदारी विद्यापीठनियुक्त समितीची राहील. यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास त्यास संबंधित समिती जबाबदार राहील. याशिवाय प्रस्तावासोबत जोडण्यात येणाऱ्या वरील कागदपत्रांची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

३. सदरचे शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र. २०१६०५०७१२१४२०५९०८ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Vasantrao Kharke

Digitally signed by Dattatray Vasantrao Kharke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Desk Officer, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=[illegible]
cn=Dattatray Vasantrao Kharke
Date: 2016.05.07 [illegible] +05'30'

(द. व. खारके)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.